 ISSN:-2347-2723

# मराठे कालीन प्रमुख मर्दानी खेळ

*अशोक ज्ञानोबा पाटील*

श्री. एम. एच. खापणे कॉलेज, पाचल ता. राजापूर, जि. रत्नागिरी

***सारांश :***

मराठेकाळात मर्दानी खेळांना अतिशय महत्व प्राप्त झाले होते. भोगोलिक परिस्थिती या खेळांच्या विकासाला कारणीीूत ठरली होती.यावेळी शिक्षणचे लष्करी शिक्षण, व्यावहारीक शिक्षण व धार्मिक शिक्षण असे तीन प्रमुख विभाग होते. मर्दानी खेळ हे लष्करी शिक्षणामध्ये येत असूनत्यांचे शिक्षण देणाऱ्या शाळा व पुस्तके त्यावेळी उपलब्ध नव्हती. या शिक्षणामध्ये मल्लविद्या व यूध्दोपयोगी हत्याराचा वापर यांचे शिक्षण दिले जात होते.[१] मल्लविद्येमध्ये जोर, बैठका ,सुर्यनमस्कार, मल्लखांब, लेझीम, कुस्ती, वज्रमुष्टी, वनज (गुंड) उचलणे या व्यायामांचा समावेश होता.

**प्रस्तावना :**

घोडयावर बसणे, तलवारबाजी, भालाफेक, दांडपट्टा इत्यादींचे शिक्षण चांगला सैनिक तयार करण्यासाठी दिले जात होते. हे शिक्षण देण्यासाठी चांगले प्रशिक्षक नेमले जात होते. गावागावातील तालमीमध्ये अनुभवी व्यक्तीवर ही जबाबदारी सोपविली जात होती. त्यामुळे शरीर कमविणे, खेळ व व्यायाम याला अतिशय महत्व प्राप्त झाले होते. समाजाच्या सर्व थरातील लोक या खेळामध्ये सहभागी होत असल्यामुळे त्यामधुन लोकांचे चांगले मनोरंजन झाले. स्वत: राज्यकर्त्यांना या खेळाची आवड असल्यामुळे या खेळांना उत्तेजन मिळाले. विविध सण—समारंभ प्रसंगी व दरबारात आलेल्या पाहुण्यांच्या मनोरंजनासाठी राज्यकर्ते या खेळांचे आयोजन करत असत. तसेच गावातील यात्रा व सणसमारंभच्या निमित्तानेही अशा खेळांचे आयोजन गावागावामध्येही केले जात होते. लोकांचे मनोरंजन करणाऱ्या प्रमुख मर्दानी खेळांचा विकास मराठेकाळात पुढीलप्रमाणे झाला होता.

**१. कुस्ती —**

मराठेकाळातील सर्वात लोकप्रिय खेळ म्हणजे कुस्ती किंवा मल्लविद्या हा होय. प्राचीन काळापासून हा खेळ महाराष्ट्रात उदयास आला. मात्र मराठेकाळात या खेळाचा खूपच विकास झाला. मराठ्यांचा छत्रपती शाहू व पेशवे यांना कुस्तीची अतिशय आवड होती. बाळाजी विश्वनाथ, बाजीराव व चिमाजीआप्पा यांना युध्दकलेचा व मर्दानी खेळाचा शौक होता मात्र कुस्तीच्या शौकाची फारशी माहिती मिळत नाही. चिमाजीआप्पाच्या कुस्तीच्या शौकाबद्दल एका पोवाड्यात उल्लेख आला आहे. पोवाडा जरी निंदात्मक असला तरी पेशवाईवरील या पोवाड्यात तिघांच्या शौकाची माहिती पुढीलप्रमाणे सांगितली आहे.

थोरले ते तप करिती जान्हवी—काठी। (अमृतराय)
मधल्यांच्या भोवती असे ती बायकांची दाटी। (बाजीराव)
धाकटे लाविती कुस्त्या पाळूनिया जेठी। (चिमाजी आप्पा)
करोनिं ऐसे ढंग त्यांनी हो राज्य लाविली काठी।। [२]

वरीलप्रमाणे जरी पोवाड्यात वर्णन असले तरी नानासाहेब, राघेबादादा, विश्वासराव, माधवराव व बाजीराव यांच्या कुस्तीशौकाची माहिती अनेक समकालीन कागदपत्रात मिळते. त्यांनी जसे आपल्या दरबारात कलाकारांना आश्रय दिला होता तसाच पहिलवानांना ही दिला होता. दुसरा बाजीराव हा जसा ख्यालीखुशाली व रंगढंगाध्ये मश्गुल होता. तसाच पहिलवान पदरी बाळगून कुस्तीचा शौक करणारा होता. त्याने आपली ही हौस ब्रम्हवर्तास गेल्यावरही कायम खलू ठेवली. त्याच्या पदरी बालंभट्ट नावाचा प्रख्यात पहिलवान होता. त्याने लखनौचा नवाब वजीद अल्लीशहा याच्याकडून आलेल्या एका गर्विष्ठ पहिलवानाचा गर्व एका क्षणात परिहार केला होता.[३] बाळभट्टाप्रमाणेच सिद्दी, बडा हरि व छोटा हरि असे तीन प्रसिध्द पहिलवान त्याच्याजवळ होते. पहिलवान तयार करणे ही अतिशय खर्चिक बाब असल्याने श्रीमंत लोकांच्या व राज्यकर्त्यांच्या मदतीवर त्यावेळी अनेक पहिलवान तयार होत होते. कांही पहिलवानांना सरकारी तिजोरीतून पगार (रोजमारा) दिला जात असे. २५ सप्टेंबर १७३४ रोजी दोन पहिलवांनांना १३ रुपये मासिक रोजमारा दिल्याची नोंद आहे.[४] त्यापैकी एकाला ७ रुपये व दुसऱ्याला ६ रुपये असा रोजमारा होता. त्यामध्ये समानता नाही त्यावरुन पहिलवानांच्या कामगिरी नुसार त्यांचा रोजमारा दिला जात आल्याचे स्पष्ट होते. राज्यकर्त्यांच्या पदरी असणाऱ्या पहीलवानांना चांगला खुराक देण्याची व्यवस्था केली जात होती. [५] त्यामुळे सामान्य कुटुंबातील मुले कुस्तीकडे वळत होती. मराठ्यांच्या दरबारात कुस्तीला मानसन्मान मिळत गेल्यामुळे श्रीमंत व ब्राम्हण कुटुंबातील मुलांमध्ये कुस्तीची आवड निर्माण झाली. कुस्तीचा सराव करण्यासाठी तालमीमध्ये हौदा तयार करुन त्यामध्ये माती आणून टाकत. [६] मराठे राज्यकर्ते व त्यांच्या सैनिकांनाही व्यायाम व कुस्तीची आवड होती. त्यामुळे त्यांच्या सैन्याचा जिथे तळ असे तेथेही आखाडा तयार करुन ते व्यायाम करीत. खर्ड्याच्या लढाईहून विजयी होऊन परत आलेल्या फौजेच्या मिरवणूकीचे वर्णन करताना शाहीर म्हणतो—

पाहून पुर्वापार शिरस्ते । भवानी पेठेपासून रस्ते।
दिपोत्सव शोभती दुरस्ते। शृंगारुन गज तुरंग बसते।
शहरामाजी पदार्थ सस्ते। पहिलवान आणि जेठी मस्ते।
खुराक त्यांना बदाम पिस्ते। सदा जिलीबीत चालती।। [७]

थॉमस ब्राउटन हा १८०९ मध्ये दौलतराव शिंद्यांच्या सैन्याबरोबर 'कमांडर ऑफ दि रेसिडेन्स एस्कॉर्ट ॲट दि कोर्ट ऑफ शिंद्या' या हुद्द्याने फिरत होता. त्यावेळी सैन्यातील सामान्य शिपाई देखील आपल्या तालमीच्या शौकामध्ये खंड पडणार नाही याची ते कशी काळजी धेत होते याचे वर्णन केले आहे. तो आपल्या एका पत्रात लिहितो की. '' सर्व हिंदुस्थानातील लोकांना तालमीचे किंवा कसरतीचे

अगदी वेडच आहे म्हटले तरी चालेल. आखाड्यात त्यांचे काही नियम आणि समारंभ ठरलेले असतात आणि ते अत्यंत कसोशीने पाहण्यात येतात. खडक नसलेली अशी मऊ मातीची ऐसपैस जागा, शक्य झाली तर झाडाच्या सावलीखाली निवडून, ती खणून, त्यातला खडान्‌खडा वेचून काढून ती भुसभुशीत करण्यात येते. अशा जागेला ते आखाडा म्हणतात. ते तो फार पवित्र मानतात. त्याच्याजवळ जोडा आणू देत नाहीत. त्याच्या एका टोकास मातीचा ओटा तयार केलस जातो. तालमीत येणाऱ्या प्रत्येकाने ओट्याला मुजरा करुन मूठभर माती वहावयाची असते. तालमीत येणाऱ्या सर्व तालीमबाजात जो विशेष सरस लढाऊ पठ्ठा असेल त्याला मोसमापुरता आखाड्याचा 'खलिप' नेमन्यात येत असे. खलिप म्हणजे व्यवस्थापक आणि शिक्षक. त्याने आखाड्याची झाडलोट करविणे, कुस्ती वगैरे खेळ शिकविणे ही कामे करावयाची. आखाड्यातील प्रत्येकाचा लंगोट कसलेला असतो आणि विशिष्ट जातीची पांढरी माती अंगाला फासलेली असते. पहिला व्यायामाचा प्रकार म्हणजे दंड. दुसरा व्यायाम कुस्ती. हिंदंस्थानातले लोक या कलेत अत्यंत प्रविण आहेत. कुस्तीत अर्थात निव्वळ शक्तीपेक्षा कौशल्यावरच भर असतो. दंड—कुस्तीनंतर दुसरे दोन व्यायाम प्रकार म्हणजे मुगदळ आणि लेझीम'' [८] या पत्राामध्ये पुढे त्याने व्यायाम कसा केला जात होता व पहिलवान कसा तयार होत होता याचे वर्णन केले आहे.

मराठाकाळात कुस्ती करुन लोकांचे मनोरंजन करणाऱ्या पहिलवानांना त्यांच्या कामगिरीबऱ्या पहिलवानांना त्यांच्या कामगिरीबद्दल रोख बक्षिस दिले जात होते. आनंदराव नावाचा पहिलवान नानासाहेबाकडे होता. एकदा नानासाहेब साताऱ्यात असताना शाहू छत्रपतींकडे कांही जेठी आव्हान देऊन आले. तेव्हा नानासाहेबाने आनंदरावाला त्या जेठी बरोबर लढविले. त्यात आनंदरावाने कुस्तीत जेठी जिवे मारीला. म्हणून शाहूने खूष होऊन आनंदरावाला जमीन इनाम दिली. [९] शाहूंप्रमाणेच पेशवेदेखील कुस्ती करणाऱ्या पहिलवानांना मोठे बक्षिस देत असत. इ.स. १७५४ मध्ये लच्छा व कन्हैया या दोन पहिलवानांना कुस्ती केल्याबद्दल २५ रुपये बक्षिस व याचवर्षी येगा जेठी याला ७५ रुपये बक्षिस दिल्याची नोंद आढळते. याशिवाय इतर कांही पत्रात पुढीलप्रमाणे उल्लेख आढळतो.

१. खमसखमसेन रमजान छ.२० खर्च जामदार इनाम देणे पहिलवान कुस्ती लढ, सबब रसानगी चिठ्ठी आसामी २ दर आसामी आंख २४.
२. इनाम देणे सदू पाथरवट पहिलवान यांस कुस्ती लढला सबब रसानगी चिठ्ठी आं ३०.

या पत्रावरुन असे लक्षात येते की, मराठा राज्यकर्ते कर्तबगार पहिलवानांचा यथोचित करत होते. कांहीवेळी दोन्ही पहिलवान समतुल्य असतील तर त्यांची कुस्ती बराच वेळ चालल्यानंतर सोडविली जात असे. त्यावेळी दोन्ही पहिलवानांना बक्षिस मिळत होते. इ.स. १७८६ मध्ये सवाई माधवापुढे होळीच्या दिवशी आबाजी व इश्रा या दोन जेठींची कुस्ती लावण्यात आली होती. त्यांची लढत दोन घटका झाल्यानंतर सोडविण्यात आली. दौलतराव शिंदेला पहिलवानांचा फार शौक असल्याचे थॉमस ब्राउटनने म्हटले आहे. त्याच्याजवळच्या पहिलवानास दररोज एक बकरे व दहा शेर दूध इतका खुराक देत होता. हे वर्णन जरी अतिशयोक्तीचे असले तरी त्यावरुन लक्षात येते की तो पहिलवानास भरपूर खुराक देत होता. त्याच्या या मराठा पहिलवानाने एका मथुरेच्या पहिलवानास चीत मारले. त्याबद्दल दौलतरावाने तिथेच ५०० रुपयाचे कडे पहिलवसनाच्या हातात घातले. मराठ्यांच्या लहानथोर सरदारापासून छत्रपतीपर्यंत प्रत्येकाला पहिलवान बाळगणे भूषन वाटत होते. त्यांची

पहिलवानांवर इतकी खुषमर्जी होती की, वेळ प्रसंगी ते पहिलवानांना वापरण्यासाठी हत्ती, घोडे देखील देत होते. मोरो आप्पाजींच्या एका पत्रामध्ये कर्नाटकातून आलेल्या तीन जेठीबरोबर पुण्यातील पहिलवानांच्या कुस्त्या झाल्याचे कळविले आहे. त्यामध्ये मखवा गौळी व कल्ल्या गवळी या दोघांनी चित केले. व कर्नाटकातील एका जेठीने आबाजी सुतारास चित केले असे म्हअले आहे. यावरुन त्यावेळी बाहेरील प्रातांतून पहिलवान आणून त्यांच्या कुस्त्या लावल्या जात होत्या आणि सामान्य गवळी व सुतार कुटुंबातील लोकांना कुस्तीचा छंद होता हे स्पष्ट होते. या प्रमुख कुस्त्या पार पडल्यानंतर कांही स्थानिक पहिलवानांच्या कुस्त्या झाल्याचे मोरो आप्पाजी म्हणतो.

राघोबा दादाने जनार्दन बाजीरावास पाठविलेल्या एका पत्रात लिहीले आहे की, महमदहुसेन याची व ढोल्याची झोबी लावावी. आज नाना पासी मी बोललो की, महमदहुसेन पाडील. त्यास तीर्थरुप राजश्री भाऊस सांगून झोबी लावून कोण पडतो, कसे होते ते सविस्तर लिहावे. सत्वर झोबी लावावी. तीर्थरुपास कागद वाचुन दाखवून कसे होते हे लिहीणे हे आशिर्वाद. या पत्रावरुन तत्कालीन लोकांना कुस्तीबद्दल किती अतुरता होती याची कल्पना येते. बऱ्याचवेळा एखादा पहिलवान हमखास कुस्तीमध्ये यश मिळवेल असा त्यांना विश्वास वाटत असे. त्यामुळे अशा पहिलवानांवर ते पैज देखील लावत होते. राघोबा दादाचेच याबाबत एक पत्र असून त्यामध्ये तो भाऊसाहेबास लिहीतो की, तीर्थरुपाची आमची पैज पडली आहे तरी महमदहुसेनची झोंबी लावावी.

पुरुषांप्रमाणेच मराठेकालीन कांही स्त्रीयांनी देखील पहिलवानी पेशा स्विकारलेला होता. त्यांनी वस्तादाकडून शिक्षण घेऊन आपले कुस्तीसाठी कमावलेले होते. आपले तंदुरुस्त ठेवून त्या गावोगावी कुस्त्या मारण्यासाठी फिरत. त्यावेळी स्त्री—पुरुष पहिलवानांच्या ही कुस्त्या लावल्या जात होत्या. कांही स्त्रीया ह्या अतिशय तरबेज असल्यामुळे त्यांच्याबरोबर कुस्ती धरण्यासाठी नावाजलेले मल्ल ही घाबरत असत. कारण जर स्त्रीकडून पराभूत झालो तर तोंड दाखवायला जागा राहणार नाही. या भितीने ते स्त्रीयांशी कुस्ती खेळणे टाळत असत. शिंदे यांच्या लष्करातील मेजर थॉमस ब्राउंटन यांच्या रोजनिशीमध्ये स्त्री मल्लाबद्दल असे लिहीले आहे की: “The act is sometimes practiced by women , who study to make their bodies hardy and their flesh firm. These amazons sometimes attain to such a degree of proficiency the it is rare for the most experienced of their male opponents to over-throw them. The best wrestlers often decline engaging in these contests from the fear incurring the disgrace of being worsted by women.” [१३]

### ३. वज्रमुष्ठी

मराठेकालीन मर्दानी खेळामध्ये वज्रमुष्ठी हा अत्यंत आवडता खेळ असून त्यामध्ये मुष्टीयुध्द व मल्लयुध्द यांचे मिश्रण असे. या क्रिडा प्रकारात सहभागी होणाऱ्या खेळाडूंना जेठी असे म्हणत. खासकरुन श्रीमंत वर्ग व राज्यकर्त्यांच्या मनोरंजनासाठी त्यांची झोंबी लावली जात असे. मराठेकाळात जसे कुस्ती करणारे पहिलवान होते तसेच वज्रमुष्ठीत पटाईत असणारे जेठी देखील होते. सर चार्ल्स मॅलेट व त्यांच्या सहकाऱ्यांना या खेळाची अतिशय आवड असल्याने तो ते पाहण्यासाठी खास करुन राजवाड्यावर हजर राहत असत. त्यापैकी मेजर प्राईस याने रोजनिशीत या खेळाचा वृत्तांत पुढीलप्रमाणे लिहून ठेवला आहे.

''या खेळाडूविषयी (मुष्टियोध्दे) आणि त्यांच्या खेळाविषयी मला असे म्हणावे वाटते की, या खेळासाठी नेहमी एक वर्तुळ आकार ७ फूट खोल हवदा खणीत, त्याच्या बाजू जमिनीशी काटकोनात असत व त्याचा परीघ साधारणतः ३० फूट असे. हौदाच्या तळात माती घालीत. जेठी लंगोट हे तोकडे वस्त्र सोडल्यास जवळ जवळ नग्न असत. त्याच्या हाताच्या बोटात नखांचा आकार दिलेले शिंगापासून मुठी असत. या क्रिडा प्रकारात कुस्ती व वज्रमुष्ठी या दोन्हींचा अंतर्भाव असे. या खेळाडूंना योग्य प्रकारे आणि काळजीपूर्वक प्रशिशण दिलेले दृष्टोत्पत्तीस आले. पेशवे हे दृश्य पाहुन अतिशय आनंदीत झालेले दिसले. शिवाय मुष्टियोध्दे ज्यावेळी पेशव्यांचा उल्लेख दख्खन का बादशहा असा पुकारा देऊन मुजरा करीत. त्यावेळी ते बेहद्द खुष होत. यासुमारास पेशवा ३० वर्षांचा असावा. तारुण्याने मुसमुसलेले त्याचे व्यक्तिमत्व अतिशय आकर्षक होते.''

सवाई माधरावांच्या काळात गोविंद जेठी, मीना जेठी आणि तिम्मा जेठी हे दसऱ्याच्या पोशाखाचे सन्माननीय मानकरी होते. त्यांना माधवरावाने अनुक्रमे १५०रुपये, १४७ रुपये व ९९ रुपये आठ आणे किंमतीची वस्त्रे प्रदान केली होती. हा खेळ पेशव्यांपासून सर्व मराठा सरदारांना व त्यांच्या सैनिकांचा आवडता असून त्यांचे मनोरंजन करणारा होता. त्यामुळे त्यामध्ये रस घेत होते. सवाई माधवरावाला वज्रमुष्ठी हा खेळ अतिशय आवडत होता. हे त्यांच्या दिनचर्येत आलेल्या पुढील नोंदीवरुन लक्षात येते.

१. शिंदे, पोरगे यांच्या वज्रमुष्ठीच्या लढाया लावतात. एखादा थकून पडला तथापि ढालाइताकडून सोडगे मारवावे बळेच ऊभे करुन पुन्हा लढवावे. नाकातून, तोंडातून रक्ते आली तथापि सोडू देत नाहीत. दोन चार मुले दुखण्यास पडली आहेत. या दिनचर्येवरुन असे लक्षात येते की, वज्रमुष्ठीचा खेळ अतिशय चुरशीचा असून समोरच्या जेठीने कितीही हाल केले तरी सहजासहजी खेळ सोडता येत नव्हता.
२. दोनपरी मुले घेऊन बसावे, मनस्वी खेळ करावे, वज्रमुष्ठीच्या ध्वजा कराव्या. असे होत असते. यामध्ये त्याने व्यायामाचे व वज्रमुष्ठीच्या खेळाची मनापासून आवड निर्माण झाल्याचे मान्य केले आहे.
३. गणेशपंत पेठे यांचा नमस्कारास येत असतो. त्याचे शरीर वायुबध्द आहे. स्थुल बहूत आहे. त्याजला दोन दिवस चौसोपित एक प्रदक्षिणा धाववितात, बैठका करवितात. आपल्यासोबत व्यायाम करणाऱ्या मुलांच्या तंदुरुस्तीचे सुक्ष्म निरीक्षण सवाई माधवराव करत होता, हे या दिनचर्येतून समजते.

**गोषवाराः—**

मराठेकाळात मर्दानी खेळांना अतिशय महत्व प्राप्त झाले होते. महाराष्ट्राची भौगालिक परिस्थिती या खेळाच्या विकासाला कारणीभूत ठरली होती. या लष्करी शिक्षण, व्यावहारीक शिक्षण व धार्मिक शिक्षण असे तीन प्रमुख विभाग होते. मर्दानी खेळ हे लष्करी शिक्षणांमध्ये येत असून त्याचे शिक्षण देणाऱ्या शाळा व पुस्तके त्यावेळी उपलब्ध नव्हती. या शिक्षणामध्ये मल्लविद्या व युध्दोपयोगी हत्याराचा वापर याचे शिक्षण दिले जात होते. मल्लविद्येमध्ये जोर, बैठका, सुर्यनमस्कार, मल्लखांब, लेझीम, कुस्ती, वज्रमुष्ठी, वनज (गुंड) उचलणे या व्यायामांचा समावेश होता. घोडयावर बसणे,

तलवारबाजी, भालाफेक, दांडपट्टा इत्यादींचे शिक्षण चांगला सैनिक तयार करण्यासाठी दिले जात होते. हे शिक्षण देण्यासाठी चांगले प्रशिक्षक नेमले जात होते. गावागावातील तालमीमध्ये अनुभवी व्यक्तीवर ही जबाबदारी सोपविली जात होती. त्यामुळे शरीर कमविणे, खेळ व व्यायाम याला अतिशय महत्व प्राप्त झाले होते. समाजाच्या सर्व थरातील लोक या खेळामध्ये सहभागी होत असल्यामुळे त्यामधुन लोकांचे चांगले मनोरंजन झाले. स्वत: राज्यकर्त्यांना या खेळाची आवड असल्यामुळे या खेळांना उत्तेजन मिळाले. विविध सण—समारंभ प्रसंगी व दरबारात आलेल्या पाहुण्यांच्या मनोरंजनासाठी राज्यकर्ते या खेळांचे आयोजन करत असत. तसेच गावातील यात्रा व सणसमारंभच्या निमित्तानेही अशा खेळांचे आयोजन गावागावामध्येही केले जात होते.

मराठेकाळातील सर्वात लोकप्रिय खेळ म्हणजे कुस्ती किंवा मल्लविद्या हा होय. प्राचीन काळापासून लोकप्रिय असलेलया खेळाचा विकास मराठेकाळात झाला होता. मराठ्यांचा छत्रपती शाहू व पेशवे यांना कुस्तीची अतिशय आवड होती. पेशव्यावरील एका निंदात्मक पोवाडयात कुस्तीच्या शैकाची माहिती आढळते. पेशवा नानासाहेब नानासाहेब, राघेबादादा, विश्वासराव, माधवराव व बाजीराव यांच्या कुस्तीशौकाची माहिती अनेक समकालीन कागदपत्रात मिळते. त्यांनी जसे आपल्या दरबारात कलाकारांना आश्रय दिला होता तसाच पहिलवानांना ही दिला होता. दुसरा बाजीराव हा जसा ख्यालीखुशाली व रंगढंगाध्ये मश्गुल होता. तसाच पहिलवान पदरी बाळगून कुस्तीचा शौक करणारा होता. त्याने आपली ही हौस ब्रम्हवर्तास गेल्यावरही कायम खलू ठेवली होती. पहिलवान तयार करणे ही अतिशय खर्चिक बाब असल्याने श्रीमंत लोकांच्या व राज्यकर्त्यांच्या मदतीवर त्यावेळी अनेक पहिलवान तयार होत होते. कांही पहिलवानांना त्यांच्या कामगिरी नुसार सरकारी तिजोरीतून पगार (रोजमारा) दिला जात असल्याचे स्पष्ट होते. मराठी सैन्याचा जिथे तळ असे तेथेही आखाडा तयार करुन ते व्यायाम करीत. थॉमस ब्राउटनने दौलतराव शिंदेच्या सैन्याबरोबर फिरताना सैनिकांच्या कुस्तीशैकाचे उत्तम वर्णन आपल्या लिखानात केले आहे. मराठा काळात कुस्ती करुन लोकांचे मनोरंजन करणाऱ्या पहिलवानांना त्यांच्या कामगिरीबद्दल रोख बक्षिस दिले जात होते. त्यावेळी बाहेरील प्रांतातून पहिलवान आणून त्यांच्या कुस्त्या लावल्या जात होत्या. पुरुषांप्रमाणेच मराठेकालीन कांही स्त्रीयांनी देखील पहिलवानी पेशा स्विकारलेला होता.

मराठेकालीन मर्दानी खेळामध्ये वज्रमुष्ठी हा अत्यंत आवडता खेळ असून त्यामध्ये मुष्टीयुध्द व मल्लयुध्द यांचे मिश्रण असे. या क्रिडा प्रकारात सहभागी होणाऱ्या खेळाडूंना जेठी असे म्हणत. खासकरुन श्रीमंत वर्ग व राज्यकर्त्यांच्या मनोरंजनासाठी त्यांची झोंबी लावली जात असे. मराठेकाळात जसे कुस्ती करणारे पहिलवान होते तसेच वज्रमुष्ठीत पटाईत असणारे जेठी देखील होते. सर चार्ल्स मॅलेट व त्यांच्या सहकाऱ्यांना या खेळाची अतिशय आवड असल्याने तो ते पाहण्यासाठी खास करुन राजवाड्यावर हजर राहत असत. त्यापैकी मेजर प्राईस याने रोजनिशीत या खेळाचा वृत्तांत विस्तृतपणे लिहून ठेवलेला आढळतो. सवाई माधरावांच्या काळात गोविंद जेठी, मीना जेठी आणि तिम्मा जेठी हे दसऱ्याच्या पोशाखाचे सन्माननीय मानकरी होते. त्यांना माधवरावाने अनुक्रमे १५०रुपये, १४७ रुपये व ९९ रुपये आठ आणे किंमतीची वस्त्रे प्रदान केली होती. हा खेळ पेशव्यांपासून सर्व मराठा सरदारांना व त्यांच्या सैनिकांचा आवडता असून त्यांचे मनोरंजन करणारा होता. त्यामुळे त्यामध्ये रस घेत होते. सवाई माधवरावाला वज्रमुष्ठी हा खेळ अतिशय आवडत होता. हे त्यांच्या दिनचर्येत आलेल्या नोंदींवरुन लक्षात येते.

***संदर्भ:–***


१. केळकर य.न. भूतावर भ्रमण (ऐति. लेखसंग्रह), पृ.११०
२. कित्ता, पृ.११०
३. सरदेसाई गो. स. पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खं.७ पत्र ९६
४. चिटणिस दप्तर रु.३७पु.१ का. १९६९०, १९६९२
५. भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ.५०
६. केळकर य.न. ऐतिहासिक पोवाडे पृ. १९०
७. केळकर य.न. पूर्वोक्त, पृ. १११
८. कित्ता, पृ.१०५
९. कित्ता, पृ.१०९
१०. सरदेसाई गो. स. पूर्वोक्त, खं.१८ पत्र ८९
११. डॉ. देशमुख शारदा शिवकालातील व पेशवाईतील स्त्री—जीवन, पृ.५२
१२. कित्ता, पृ.५३
केळकर य.न. इतिहासातील सहली पृ. २३१—२३६
१३. परसनि द.ब., अनुवाद डॉ. देशपांडे सुरेश, पेशवेकालीन पुणे, पृ १०१
१४. कित्ता, पृ.१०१
१५. भावे वा. कृ. पूर्वोक्त, पृ. ५३
१६. केळकर य.न. भूतावर भ्रमण, पृ.१०८